# पानोपानी उलगडत जाणारे - वास्तुहस्य

दगडविटांचे बांधकाम तयार करून ते जेव्हा पूर्णत्वाला जाते तेव्हा वास्तू पूर्ण होते. या अंकात घरकुल या विषयावरील विविध पैलूना स्पर्श करणारा अनुभव आहे. हा अंक ज्योतिभस्कि जयंतराव साळगावकर याच्या हस्ते प्रसिद्ध झाला आहे. वास्तुशास्त्र अंधश्रद्धा नसून श्रद्धा आहे असा प्रयत्न या अंकाची मांडणी करणाऱ्या संपादकांनी केला आहे. या अंकात सर्वसामान्याना आवश्यक असलेली माहिती देण्यात आली आहे. वास्तुशास्त्राच्या मूलभूत तत्त्वांवर प्रकाश टाकणारे डॉ. नरेंद्र सहस्त्रबुद्धे, डॉ. घुंडीराज पाठक, सद्‌गुरु गुरुनाथ मुंगळे यांचे लेख तसेच वास्तुशास्त्राचे अध्यात्माशी नाते सांगणारे 'वैदिक वास्तुशास्त्र - एक पूर्ण विज्ञान' ता डॉ. दयानंद राणे यांचा लेख वास्तुअभ्यासकांनाही मार्गदर्शक ठरेल असा आहे. वास्तुशास्त्रीय ग्रंथ परंपरेचा आढावा घेणारा 'वास्तुशास्त्र ग्रंथपरंपरा' हा लेख य. न. मगीवार यांच्या लेखणीतून साकार झाला आहे. वास्तूच्या देवघर, प्रवेशद्वार, अभ्यासिका, शयनकक्ष, स्वयंपाकघर,




बगीचा अशा विविध अंगांना स्पर्श करणारा लेख 'वास्तुरहस्य'च्या सौंदर्यात भर टाकणारे आहेत. फेंगशुई, डाऊझिंग, पिरॅमिड, वास्तु-योग ज्योतिषासंदर्भातील लेखही यात आहेत. प्रा. ब्र. सुरेश देवळे यांच्या निधनानिमित्त त्यांना भावपूर्ण आदरांजली वाहणारा लेखही यात आहे. यात लक्ष्मीप्राप्तीकरीता प्रभावी तोडगे, वास्तुदोष निवारणार्थ प्रभावी उपाय तसेच व्यावसायिक भरभरारीसाठी विविध तोडगे दिले आहेत.

संपादक - प्रकाशक
बबनराव पाटील
पृष्ठे : २२२